# दोन महिन्यांत प्रथमच सर्वात कमी बळींची नोंद

## रुग्णवाढीचा दर २ टक्क्यांनी कमी, दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी | नगर

जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांत प्रथमच कोरोनामुळे सर्वात कमी म्हणजे केवळ दोघांच्या मृत्यूची नोंद शुक्रवारी झाली. ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये दररोज १०ते २५जणांचा बळी जात होता. रुग्णवाढीचा दरही दोन टक्क्यांनी कमी झाला आहे.

ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये दररोजची रुग्णसंख्या एक हजारच्या पुढे गेली होती. १४ ऑगस्टला सर्वाधिक २५ जणांचा बळी कोरोनाने घेतला. सप्टेंबरमध्ये १० ते २५जणांच्या मृत्यूची नोंद होत होती. १८ ऑक्टोबरपासून मृत्यूदर काही प्रमाणात कमी झाला. १८ ऑक्टोबरपासून ते २ सप्टेंबरपर्यंत मृत्यूदर घटला असून, १८ ऑक्टोबरला २० जणांचा बळी करणामुळे गेला होता. १९ सप्टेंबरला १७ जणांचा बळी गेला होता. २२सप्टेंबरला १८, २३ सप्टेंबरला १२, २४ सप्टेंबरला १२, २५ सप्टेंबरला ९, २६ सप्टेंबरला १४, २७ सप्टेंबरला ५, २८ सप्टेंबरला १०, २९ सप्टेंबरला १२, १ ऑक्टोबरला ६ व २ ऑक्टोबरला २ जणांचा बळी गेला आहे. गेल्या दोन महिन्यात प्रथमच सर्वात कमी मृत्यूची नोंद ही शुक्रवारी झाली आहे. गेल्या सहा दिवसात पॉझिटिव्ह रुग्ण वाढीचा दरही घटला आहे. यापूर्वी २७.८१ टक्के पॉझिटिव्ह रुग्ण वाढीचा दर होता. आता तो २५.८१ टक्के झाला आहे. त्यामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. शुक्रवारी रुग्णसंख्येत ५९७ ने वाढ झाली. रुग्णांची संख्या ३ हजार १८२ झाली आहे. जिल्हा रुग्णालयाच्या कोविड चाचणी प्रयोगशाळेमध्ये ७३, खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ११० आणि अँटीजेन चाचणीत ४१४ बाधित आढळले. जिल्हा रुग्णालयात मनपा हद्दीतील २०, अकोले ५, जामखेड ६, कर्जत १, नगर ग्रामीण ५, पारनेर २, राहुरी १, शेवगाव १, श्रीगोंदे १५, कॅन्टोन्मेंट १, मिलिटरी हॉस्पिटल १५ आणि इतर जिल्ह्यातील १ रुग्णाचा समावेश आहे. खासगी प्रयोगशाळेत मनपा ४२, अकोले २, जामखेड ६, कर्जत १, कोपरगाव १, नगर ग्रामीण १४, नेवासे ५, पारनेर ८, पाथर्डी ६, राहाता ५, राहुरी ५, संगमनेर ९, शेवगाव २, श्रीगोंदे २, श्रीरामपूर १ रुग्णाचा समावेश आहे.



### घरी सोडलेले रुग्ण

७५५ रुग्णांना शुक्रवारी डिस्चार्ज मिळाला. यामध्ये मनपा १६३, अकोले ४५, जामखेड ३५, कर्जत ४९, कोपरगाव ३२, नगर ग्रामीण ३८, नेवासे २७, पारनेर २९, पाथर्डी ६१, राहाता ४५, राहुरी ३७, संगमनेर ८१, शेवगाव १४, श्रीगोंदे २९, श्रीरामपूर ५३, कॅन्टोन्मेंट ७, मिलिटरी हॉस्पिटल १० रुग्णांचा समावेश आहे.

लोकमत

## ५९७ रुग्ण वाढले : जिल्ह्यात एकूण कोरोनाबाधितांची संख्या ४५ हजार

# नगर जिल्ह्यातील ४० हजारांहून अधिक रुग्ण झाले बरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर :** जिल्ह्यात आतापर्यंत ४० हजार ३१७ कोरोनाचे रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. रुग्ण बरे होण्याचे हे प्रमाण ८९.५४ टक्के आहे. दरम्यान, शुक्रवारी ७५५ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला, तर ५९७ नवीन रुग्ण आढळले. जिल्ह्यात एकूण रुग्णांचा आकडा ४५ हजार २५ झाला आहे.

शुक्रवारी जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये ७३, खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ११० आणि अँटीजेन चाचणीत ४१४ रुग्ण बाधीत आढळले. जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये बाधीत आढळून आलेल्या रुग्णांमध्ये मनपा २०, अकोले ५, जामखेड ६, कर्जत १, नगर ग्रामीण ५, पारनेर २, राहुरी १, शेवगाव १, श्रीगोंदा १५, कॅंटोन्मेंट १, मिलिटरी हॉस्पिटल १५ आणि इतर जिल्हा १ अशा रुग्णांचा समावेश आहे.

- बरे झालेली रुग्ण संख्या : 40,313
- उपचार सुरु असलेले रुग्ण : 3,982
- मृत्यू : 726
- एकूण रुग्ण संख्या : 45,025

खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्या ११० रुग्णांची नोंद एकूण रुग्ण संख्येत घेण्यात आली. यामध्ये मनपा ४२,अकोले २, जामखेड ६, कर्जत १, कोपरगाव १, नगर ग्रामीण १४, नेवासा ५, पारनेर ८, पाथर्डी ६, राहाता ५, राहुरी ५, संगमनेर ९, शेवगाव २, श्रीगोंदा २, श्रीरामपूर १, कॅंटोन्मेंट १ अशा रुग्णांचा समावेश आहे. अँटीजेन चाचणीत ४१४ जण बाधित आढळले. यामध्ये मनपा ३१, अकोले १५, जामखेड ५१, कर्जत ४०, कोपरगाव १२, नगर ग्रामीण २२, नेवासा ३५, (पान १० वर)

लोकमत

शेतकरी, कामगार कायद्याला विरोध, मराठा आरक्षणाची मागणी, हाथरस येथील पीडितेवर झालेला अत्याचार व राहुल गांधी यांना झालेल्या धक्का-बुक्कीच्या निषेधार्थ शुक्रवारी जिल्ह्यात आंदोलने झाली.

# आंदोलन वार

# शेतकरी, कामगार विरोधी कायद्याचा काँग्रेसकडून निषेध

## शहरासह जिल्हाभरात आंदोलन : सरकार मूठभर भांडवलदारांसाठी, केंद्र सरकारकडून शेतकरी, कामगारांवर अन्याय

लोकमत न्यूज नेटवर्क



शेतकरी, कामगारविरोधी कायद्याच्या विरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांनी मार्केटयार्ड येथे आंदोलन केले.

**अहमदनगर :** केंद्र सरकार मूठभर भांडवलदारांच्या पाठीशी असल्याचा आरोप करत शेतकरी, कामगारविरोधी कायद्यांचा काँग्रेसकडून शुक्रवारी निषेध करण्यात आला. तसेच जिल्ह्यात गट व गणनिहाय आंदोलन करण्याचे आंदोलनकर्त्यांकडून जाहीर करण्यात आले.

नगर शहर व जिल्हा काँग्रेसच्यावतीने शुक्रवारी शेतकरी, कामगार बचाव दिवस पाळण्यात आला. येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. आंदोलनात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष प्रताप शेळके, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, जिल्हा समन्वयक ज्ञानदेव वाफारे, ज्येष्ठ नेते दिप चव्हाण, तालुकाध्यक्ष संपतराव म्हस्के, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब गुंजाळ, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब हराळ, अल्पसंख्याक विभागाचे शहर अध्यक्ष अज्जू शेख, तालुका युवक काँग्रेसचे नेते अक्षय कुलट, क्रीडा विभागाचे प्रवीण गीते, शानु शेख, कोकाटे सर, लांडे सर, जयंत वाघ, शिल्पा दुसुंगे, शरद ठोंबे, विद्यार्थी शहर अध्यक्ष दानिश शेख, मुबीन शेख, अन्वर सय्यद, दीपक धाडगे, योगेश काळे आदींचा समावेश होता. यावेळी मोदी सरकारने शेतकरी, कामगार विरोधी केलेले कायदे हे या घटकांना देशोधडीला लावणारे असल्याचा आरोप काँग्रेसचे अहमदनगर शहर जिल्हा निरीक्षक डॉ. अनिल भामरे यांनी केला. यावेळी प्रताप शेळके, किरण काळे, जिल्हा समन्वयक ज्ञानदेव वाफारे यांनीही सरकारवर टीका केली. आंदोलनादरम्यान अहमदनगर शहर जिल्हा काँग्रेसचे अनारभाई सय्यद यांनी मोदी - योगी सरकारच्या निषेधार्थ मुंडन केले.

### मोदी-योगी हाय-हाय ची घोषणाबाजी

- उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये सामूहिक बलात्काराची बळी ठरलेल्या पीडित युवतीला न्याय मिळावा, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्यावतीने करण्यात आली.
- खासदार राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्याबरोबर करण्यात आलेली गैरवर्तणूक व राहुल गांधींना केलेल्या धक्काबुक्कीच्या घटनेचा आंदोलकांनी निषेध करत मोदी-योगी हाय-हाय अशी घोषणाबाजी केली.

लोकमत

# भावाने मराठा आरक्षणाची ओवाळणी द्यावी

## दुर्गा तांबे : संगमनेरात महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या घरासमोर ठिय्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**संगमनेर :** मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी (दि.२) काँग्रेस प्रदेशाध्यक्ष महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानाबाहेर मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये महसूलमंत्री थोरात यांच्या भगिनी नगराध्यक्षा दुर्गा तांबे, मेहुणे आमदार डॉ. सुधीर तांबे सहभागी झाले होते. 'भावाने मला मराठा आरक्षणाची ओवाळणी द्यावी', अशी आग्रही मागणी नगराध्यक्षा तांबे यांनी केली.

मराठा क्रांती मोर्चाचे संगमनेरातील समन्वयक शरद थोरात, अमोल खताळ, राजेंद्र देशमुख, अमोल कवडे, अविनाश सातपुते, किरण घोटेकर, निर्मला गुंजाळ, अर्चना बालोडे यांसह सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात, जिल्हा परिषद सदस्य अजय फटांगरे, रामहरी कातोरे, पंचायत समितीचे उपसभापती नवनाथ अरगडे, रमेश काळे, शोन थोरात, दिनेश फटांगरे, नारायण खुळे, अभिषेक थोरात, राजू सातपुते, महेश वाकचौरे, सुधाकर गुंजाळ, अशोक सातपुते आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

मराठा क्रांती मोर्चाच्या राज्य समन्वयकांची नाशिक मध्ये बैठक झाली होती. समाजाला आरक्षण मिळण्यासाठी २ ऑक्टोबरला खासदार, आमदार यांच्या घरासमोर निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चाच्या संगमनेरातील समन्वयकांनी देखील बैठक घेतली होती. त्यानंतर आंदोलन करत घोषणाबाजी करण्यात आली.

लोकमत

# कृषी अवजारांसाठी ऑनलाईन अर्ज करा

## शंकरराव गडाख : शेतकऱ्यांसाठीचे अभियान सुरुच

लोकमत न्यूज नेटवर्क

**नेवासा :** राज्य शासनाने यंदाही कृषी यांत्रिकीकरण उपअभियान राबविण्याचे ठरविले आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांना कृषी अवजारे खरेदीसाठी अर्थसहाय्य अनुदान देण्यात येणार आहे. त्यासाठीची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु झाली आहे.

शासनाच्या महाडीबीटी महाआयटीआय या संकेतस्थळावर [illegible] सादर करावेत, असे आवाहन जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी केले आहे.

ट्रॅक्टर व ट्रॅक्टरचलित अवजारांना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुदान मर्यादा राहणार आहे. योजनेंतर्गत शेतकऱ्यांना गरजेप्रमाणे ट्रॅक्टर, रोटावेटर, पावर टिलर, पेरणी यंत्र, कल्टीवेटर, ट्रॅक्टर फवारणी यंत्र, मळणी यंत्र, मोगडा, पाचटकुट्टी, रिपर बाईंडर, मल्चर आदी अवजारांची [illegible]

# सप्टेंबरमध्ये कोरोनाचे ४२६ बळी

## मृत्यूदर कमी पण संख्येत वाढ; रुग्ण बरे होण्याचे प्रमाण दिलासादायक

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

एकीकडे जिल्ह्यात कोरोना बाधितांचा आकडा पन्नास हजारांच्या दिशेने चालला असून, मृत्यूची संख्याही वाढली आहे. सप्टेंबर महिन्यात कोरोनाने तब्बल ४२६ जणांचा बळी घेतला आहे. सप्टेंबरमध्ये बाधितांची अन् मृत्यूची वाढलेली संख्या चिंताजनक आहे. या आजारातून बरे होण्याचे प्रमाण दिलासादायक आहे. वाढत्या रुग्णसंख्येमुळे मृत्यूदर कमी दिसत असलातरी, वाढती मृत्यूसंख्या कमी करणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे.



जिल्ह्यात जुलै अखेरपर्यंत कोरोनाची परिस्थिती बरीच नियंत्रणात होती. या महिन्यात ५४ जणांचा बळी गेला. मात्र, ऑगस्टमध्ये बाधितांची अन् मृत्यूची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. तब्बल १६ हजार ८१७ बाधित या महिन्यात वाढले. तर याच महिन्यात कोरोनाने तब्बल २२४ जणांचा बळी घेतला.

### महिनानिहाय मृत्यू

| | | |
|---|---|---|
| मार्च | - | ० |
| एप्रिल | - | २ |
| मे | - | ९ |
| जून | - | ३ |
| जुलै | - | ५४ |
| ऑगस्ट | - | २२४ |
| सप्टेंबर | - | ४२६ |

मात्र, ऑगस्टच्या तुलनेत सप्टेंबरमध्ये कोरोना अधिकच घातक ठरला आहे. सप्टेंबरमध्ये तब्बल २२ हजार ५६७ बाधित आढळून आले असून, ४२६ जणांचा या आजाराने मृत्यू झाला आहे. तर, २० हजार ९६२ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत.

### सप्टेंबरमधील स्थिती

आढळलेले एकूण बाधित
२२,५६७
कोरोनामुक्त झालेले रुग्ण
२०,९६२
कोरोनामुक्त रुग्णांचे प्रमाण
८८.२२ टक्के
जिल्ह्यातील मृत्यूचे प्रमाण
१.०३ टक्के

दरम्यान, शासनाने सुरू केलेल्या 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' मोहिमेमुळे आणखी रुग्ण वाढण्याची शक्यता असल्याने, एकूण बाधितांची संख्या लवकरच ५० हजारांच्या घरात जाण्याची शक्यता आहे.

# 'मुळा' आधुनिक आसवनी, इथेनॉल प्रकल्प उभारणार

## मंत्री शंकरराव गडाख; केंद्राकडून मंजुरी, कारखान्याला लाभ

**नेवासे : पुढारी वृत्तसेवा**



नवीन तंत्रज्ञानावर आधारित व प्रदूषण मुक्त आधुनिक आसवनी व इथेनॉलचा संयुक्त प्रकल्प उभारण्यासाठी मुळा कारखान्याने दिलेल्या प्रस्तावास राज्याचे साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी नुकतीच मंजुरी दिली. हा प्रकल्प वर्षभरात उभारण्यात येईल, अशी माहिती राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी दिली.

या नवीन प्रकल्पाची क्षमता प्रतिरोज ४५ हजार लिटर अल्कोहोल बनविण्याची असून, याच प्रकल्पातून तेवढ्याच क्षमतेने इथेनॉलचेही उत्पादन घेता येणार आहे. जुन्या डिस्टिलरीपासून राज्यात जे प्रदुषणाचे प्रश्न निर्माण होत होते. त्यांना आळा घालण्यासाठी प्रदूषणमुक्त प्रकल्प उभारण्यास केंद्र व राज्य सरकारने प्रोत्साहन दिले असल्याने मुळा कारखान्यानेही त्यांचा प्रस्ताव मागील वर्षी केंद्र सरकारकडे दिला होता. केंद्र सरकारकडून तो मंजूरही झाला. प्रकल्प उभारण्यासाठी आता राज्याच्या सहकार आयुक्तांनीही आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली असल्याने प्रकल्प उभारण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मंत्री गडाख यांनी सांगितले.

प्रकल्पाचा खर्च जवळपास ७० कोटींचा असून, १० टक्के स्वभांडवल, ४० टक्के साखर विकास निधीतून कमी व्याजदराने कर्ज व उर्वरित ५० टक्के रक्कम वित्तीय संस्थांकडून उपलब्ध केली जाणार आहे. प्रदुषण कायद्याच्या अडचणीमुळे जुन्या डिस्टीलरी नियमाप्रमाणे २७० दिवस चालवायला परवानगी मिळायची, त्या तुलनेत नवीन तंत्रज्ञानावर आधारित डिस्टीलरी प्रकल्प हा जवळपास वर्षभर चालविता येणार असल्याने तो आर्थिक व तांत्रीकदृष्ट्या सक्षम व लाभदायक ठरणार आहे. शिवाय याच प्रकल्पातून इथेनॉलचेही उत्पादन होणार असल्याने व इथेनॉलचे दर केंद्र सरकारने निश्चित करून दिल्याने भविष्यात हा प्रकल्प निश्चितच लाभदायक ठरेल, असा विश्वासही गडाख यांनी व्यक्त केला.

गेल्या काही वर्षांपासून साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न गुंतागुंतीचे बनत चालले असून, साखरेचे दर उत्पादन खर्चापेक्षाही कमी मिळत असल्याने डिस्टीलरीसारखे बायप्रॉडक्ट प्रकल्प कारखानदारीला पोषक ठरत आले आहेत. साखरेच्या मंदीच्या काळात अशा प्रकल्पांची साखर कारखानदारीला मदतच झाली आहे. मुळा कारखान्यानेही गेल्या २७ वर्षांपूर्वीच डिस्टीलरी उभारली. त्याचे कर्जही पहिल्या ५ वर्षांतच फेडले. तो प्रकल्प पुढेही लाभदायक ठरला, मात्र, तो २७ वर्ष जुना झाल्याने प्रदूषण व गुणवत्तेचे प्रश्न निर्माण झाले होते. कारण डिस्टीलरी प्रकल्पात विशेषत: स्पेंटवॉश हाच प्रदूषणाचा केंद्रबिंदू ठरतो. मात्र, नवीन प्रकल्पात हाच स्पेंटवॉश घट्ट करून तो आता नव्याने उभारल्या जाणाऱ्या आधुनिक बॉयलरला जळण म्हणून वापरण्याची सुविधा असल्याने प्रदूषणाला आपोआपच आळा बसणार आहे.

### इंधन म्हणून इथेनॉलचा होणार वापर

मागच्या वर्षीच कारखान्याच्या वार्षिक सभेत नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प उभारण्याचा सभासदांनी निर्णय घेतला होता. आता आणखी वर्षभरातच हा प्रकल्प उभारण्यात येईल व प्रत्यक्ष उत्पादनालाही सुरुवात होईल असे ते म्हणाले. केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल वापरण्यास प्रोत्साहन दिले असून, भविष्यात वाहतुकीलाही इंधन म्हणून इथेनॉलचा वापर वाढू शकतो. त्यादृष्टीने भविष्यातही हा प्रकल्प लाभदायक ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले.

# तनपुरे यांच्या हस्ते तिसगावमध्ये जलपूजन

पाथर्डी तालुका : पुढारी वृत्तसेवा

पाथर्डी तालुक्याच्या पश्चिम भागातून वाहत असणाऱ्या वांबोरी चारी योजनेतून तिसगावमधील बंधारे मुळा धरणाच्या पाण्याने तुडुंब भरले आहेत. या बंधाऱ्यांचे जलपूजन नगर व पुनर्वसन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पावसाळा संपत आला, तरी तिसगावला समाधानकारक पाऊस झाला नसल्याने, बंधारे, तलाव कोरडेठाक पडलेले असल्याने तिसगावकरांनी राज्यमंत्री तनपुरे यांच्याकडे बंधाऱ्यात पाणी सोडण्याची मागणी केली होती. शिरापूर, करंजवाडी, तिसगाव येथील सर्व बंधारे तुडुंब भरले आहेत. तिसगाव येथील वाघ वस्तीवरील बंधाऱ्याचे जलपूजन मंत्री तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. बंधारे भरलेले पाहून राज्यमंत्री तनपुरे यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी तिसगावचे पुढारीचे भाऊसाहेब लवांडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भिटे, जवखेडेचे सरपंच अमोल वाघ, राष्ट्रवादीचे युवकचे शिवशंकर राजळे, तिसगावचे माजी उपसरपंच इलियास शेख, सुनील पुंड, जालिंदर वामन आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री तनपुरे यांच्या प्रयत्नांमुळेच आज या बंधाऱ्यात पाणी आले असून, अनेक शेतकऱ्यांच्या रब्बीचा प्रश्न यामुळे सुटणार असल्याची भावना पुढारीचे भाऊसाहेब लवांडे यांनी व्यक्त केली.

वांबोरी चारी योजनेतून किती तलाव भरले, किती तलावात पाणी सोडणे बाकी आहे व सध्या कोणत्या तलावात पाणी चालू, अशी माहिती यावेळी राज्यमंत्री तनपुरे यांनी घेतली. योजनेतील प्रत्येक तलाव वांबोरी चारीच्या पाण्याने भरून दिले जातील, असेही तनपुरे यांनी या प्रसंगी सांगितले.

पुढारीचे लवांडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी पुढारीत राहुरी येथे जाऊन राज्यमंत्री तनपुरे यांची भेट घेत तिसगावच्या तलावात पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून, सध्या तिसगावच्या पाचंदे तलाव आणि खालच्या तलावात वांबोरी चारीचे पाणी सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. हे पाझर तलाव भरल्यास हजारो एकर शेती ओलिताखाली येणार आहे व तिसगावच्या पाण्याचा प्रश्नही सुटणार आहे.

यावेळी अनिल ठोंबरे, संजय लवांडे, प्रकाश शेलार, अमोल वाघ, अविनाश गवांदे, लक्ष्मण जाधव, प्रदीप वाघ, नितीन लवांडे, रफिक शेख, सचिन म्हस्के, सुनील लवांडे, शिक्षक नेते कल्याण लवांडे, जहीर पठाण, इरफान शेख, गटविकास अधिकारी डॉ. पालवे, ग्रामविस्तार अधिकारी भाऊसाहेब सावंत आदी उपस्थित होते.

### तनपुरे यांची कामाची पद्धत भावली

दौऱ्यामुळे अत्यंत व्यस्त असतानाही राज्यमंत्री तनपुरे हे दौऱ्यात भेटत असलेल्या प्रत्येक सर्वसामान्य कार्यकर्त्याचे काम ऐकून घेत, ते काम मार्गी लावण्यासाठी लगेच संबंधित अधिकाऱ्याला फोन लावतात. त्यांची ही कामाची पद्धत जनतेला त्यांच्याकडे आकर्षित करत असल्याचे दिसून येत आहे.



तिसगाव : येथील बंधाऱ्याचे जलपूजन करताना राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, भाऊसाहेब लवांडे, शिवशंकर राजळे, इलियास शेख, सुनील पुंड आदी. (छाया : सुनील अकोलकर)

पुण्यनगरी

# कोरोनामुक्त रुग्णांनी ओलांडला ४० हजारांचा टप्पा

## ७५५ रुग्णांना डिस्चार्ज तर ५९७ बाधितांची भर

**अहमदनगर :** जिल्ह्यात काल ७५५ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४० हजार ३१७ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ८९.५४ टक्के इतके झाले आहे. दरम्यान,गुरुवारी सायंकाळी सहा वाजले पासून काल सायंकाळी सहा वाजेपर्यंत रूग्ण संख्येत ५९७ ने वाढ झाली. यामुळे बाधितांची एकुण संख्या आता ४५ हजार २५ झाली असून सध्या ३ हजार ९८२ उपचार सुरू आहेत.

काल जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅब मध्ये ७३, खाजगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ११० आणि अँटीजेन चाचणीत ४१४ रुग्ण बाधीत आढळले. जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये बाधीत आढळून आलेल्या रुग्णामध्ये मनपा २०, अकोले ५, जामखेड ६, कर्जत १, नगर ग्रामीण ५, पारनेर २, राहुरी १, शेवगाव १, श्रीगोंदा १५, कॅंटोन्मेंट १, मिलिटरी हॉस्पिटल १५ आणि इतर जिल्हा १ अशा रुग्णांचा समावेश आहे.

खाजगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्यामध्ये, मनपा ४२, अकोले २, जामखेड ६, कर्जत १, कोपरगाव १, नगर ग्रामीण १४, नेवासा ५, पारनेर ८, पाथर्डी ६, राहाता ५, राहुरी ५, संगमनेर ९, शेवगाव २, श्रीगोंदा २, श्रीरामपूर १, कॅंटोन्मेंट १ अशा रुग्णांचा समावेश आहे. अँटीजेन चाचणीत बाधित आढळुन आलेल्यामध्ये, मनपा ३१, अकोले १५, जामखेड ५१, कर्जत ४०, कोपरगाव १२, नगर ग्रामीण २२, नेवासा ३५, पारनेर २८, पाथर्डी ३३, राहाता १४, राहुरी १९, संगमनेर ३६, शेवगाव ३३, श्रीगोंदा १६,, श्रीरामपूर २९ अशा रुग्णांचा समावेश आहे.

दरम्यान काल सायंकाळपर्यंतच्या चोविस तासात आणखी दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृत्युमुखी पडलेल्यांची एकूण संख्या ७२६ झाल्याचे कालच्या आहवालात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काल ७५५ रुग्णांना बरे झाल्यामुळे डिस्चार्ज मिळाला. यामध्ये मनपा १६३, अकोले ४५, जामखेड ३५, कर्जत ४९, कोपरगाव ३२, नगर ग्रामीण ३८, नेवासा २७, पारनेर २९, पाथर्डी ६१, राहाता ४५, राहुरी ३७, संगमनेर ८१, शेवगाव १४, श्रीगोंदा २९, श्रीरामपूर ५३, कॅंटोन्मेंट ७, मिलिटरी हॉस्पिटल १० अशा रुग्णांचा समावेश आहे.

# कोरोनाबाधितांचा आकडा ४५ हजार पार

## दिवसभरात ५९७ जणांना कोरोनाची लागण; ७७५ रुग्णांना डिस्चार्ज

**नगर, ता. २ :** जिल्ह्यात कोरोनाबाधितांचा आकडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आज (शुक्रवारी) दिवसभरात एकूण ५९७ जण बाधित आढळून आले असून, आजअखेरपर्यंत जिल्ह्यात ४५ हजार २५ रुग्ण आढळले. त्यांतील ४० हजार ३१७ जण बरे होऊन घरी परतले असून, ७२६ जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या विविध रुग्णालयांत ३९८२ जणांवर उपचार सुरू आहेत.

| एकुण रुग्ण | उपचार सुरू |
|---|---|
| ४५०२५ | ३९८२ |
| **बरे झालेले** | **मृत्यू** |
| ४०३१७ | ७२६ |

कोरोनाला अटकाव करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू असून, 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' उपक्रमांतर्गत घरोघरी जाऊन आरोग्यदूतांकडून नागरिकांची तपासणी सुरू आहे. याचा सध्या चांगला फायदा दिसून येत आहे. जिल्ह्यात दिवसभरात ७५५ जणांनी कोरोनावर मात केली असून, त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहेत. आजअखेरपर्यंत ४० हजार ३१७ जण बरे झाले आहेत.

जिल्हा रुग्णालयातील तपासणी अहवालात ७३ जण बाधित आढळून आले आहेत. यामध्ये महापालिका हद्दीतील २०, अकोले पाच, जामखेड सहा, कर्जत एक, नगर ग्रामीण पाच, पारनेर दोन, राहुरी एक, शेवगाव एक, श्रीगोंदे १५, कँटोन्मेंट एक, मिलिटरी हॉस्पिटल १५ व अन्य जिल्ह्यातील एका रुग्णाचा समावेश आहे.

खासगी प्रयोगशाळेतील तपासणी अहवालात ११० जण बाधित आढळून आले आहेत. यामध्ये महापालिका हद्दीत ४२, अकोले दोन, जामखेड सहा, कर्जत एक, कोपरगाव एक, नगर ग्रामीण १४, नेवासे पाच, पारनेर आठ, पाथर्डी सहा, राहाता पाच, राहुरी पाच, संगमनेर नऊ, शेवगाव दोन, श्रीगोंदे दोन, श्रीरामपूर एक, कँटोन्मेंटमध्ये एक रुग्ण आढळला आहे. यासह अँटिजेन चाचणीत आढळलेल्या ४१४ रुग्णांचा समावेश आहे.